# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:11.02.2025** **वार:मंगळवार**

---

1. आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा, वेळेचं सुयोग्य नियोजन करा-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांना सल्ला
2. राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात
3. लोकप्रतिनिधींनी जनतेच्या अपेक्षा पूर्ण करतानाच विधीमंडळाची प्रतिष्ठा अबाधित राखावी-लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांचं आवाहन आणि
4. सोयाबीन खरेदीसाठी केंद्र सरकारकडून नव्याने मुदतवाढ नाही-पणन विभागाचं स्पष्टीकरण

**<u>परीक्षा पे चर्चा-नाशिक</u>**

आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा, वेळेचं सुयोग्य नियोजन करा, आपल्या भावना कुटुंबीय किंवा प्रियजनांकडे व्यक्त करत जा आणि तणावमुक्त रहा, असा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल विद्यार्थ्यांना दिला. परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमातून त्यांनी काल नवी दिल्लीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले.....

**बैट्समैन उस प्रेशर की परवाह नहीं करता। येस सर। उसका पूरा ध्यान उस बॉल पर होता है। अगर आप भी इस प्रेशर को मन में न लेते हुए, अपना ध्यान, आज मैंने इतना पढ़ना तय किया था, ये अगर कर लेते हैं, आप आराम से उस प्रेशर में से भी अपने आपको निकाल सकते हैं।**

योग्य आहार आणि शांत झोप या दोन्ही गोष्टींचं महत्त्व सांगताना मोदी म्हणाले.....

**पोषण में शरीर की वेलनेस के लिए, फिटनेस के लिए, नींद का बहुत महत्व है और इन दिनों तो पूरा मेडिकल सांइस इस बात पर केन्द्रित हो रहा है कि जो पेशेंट आता है, उसकी नींद कैसी है, कितने घंटे सोता है, ये सारे सवालों का बहुत गहराई से अध्ययन करना।**

पालकांनी विद्यार्थ्यांमधील क्षमता, त्यांच्या इच्छा ओळखावी आणि त्यांना प्रोत्साहन देऊन मदत करावी, असं आवाहन पंतप्रधानांनी पालकांना केलं. देशातल्या विविध राज्यातून आलेल्या 36 विद्यार्थ्यांशी पंतप्रधानांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरं त्यांनी दिली. राज्यातही विविध ठिकाणी विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम ऐकला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत विद्यार्थ्यांसमवेत हा कार्यक्रम ऐकला. विद्यार्थ्यांनी इतरांशी स्पर्धा न करता स्वतःशी स्पर्धा करावी आणि मनातल्या भितीवर विजय मिळवावा, असा सल्ला मुख्यमंत्र्यांनी दिला. परीक्षा हेच अंतिम उद्दिष्ट नसून विद्यार्थ्यांनी जीवनातल्या आव्हानांशी सामना कसा करावा हे समजून घेण्यासाठी परीक्षा पे चर्चा हा संवाद उपयुक्त आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. नाशिकच्या विद्या प्रबोधिनी प्रशालेतील श्रावणी वैद्य, या विद्यार्थिनीनं या कार्यक्रमाबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या....

**मला हे सांगताना खूप आनंद होतो आहे की आमच्या सरकारने आम्हाला ही संधी उपलब्ध करून दिली की आम्ही आमच्या देशाचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधू व चर्चा करू. तर हे म्हणजे परीक्षा पे चर्चा हे कार्यक्रम. या कार्यक्रमातून आपल्याला हा संदेश मिळतो की वेळेचे महत्व व भौतिक कौशल्याचे महत्व, ते आपल्याला हे**

**सांगू इच्छितात की फक्त अभ्यासच नव्हे तर इतर गोष्टी जशा खेळ, नृत्य, संगीत हे देखील आपल्या आयुष्यात तितकेच गरजेचे आहेत जेवढा अभ्यास. मी आपल्या पंतप्रधानांना धन्यवाद करू इच्छिते की त्यांनी आम्हाला ही संधी उपलब्ध करून दिली.**

## बारावी परीक्षा

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेला आजपासून राज्यभरात सुरुवात होत आहे. या परीक्षेसाठी 15 लाख 5 हजार 37 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असल्याची माहिती मंडळानं दिली आहे. राज्यभरातील 3 हजार 373 मुख्य केंद्रावर परीक्षा होणार आहे. परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा, या दृष्टीने मंडळानं 271 भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येणार आहे. या अंतर्गत राज्यातल्या संवेदनशील परीक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्याने निगराणी ठेवली जाणार आहे. तसंच, परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येणार आहे.

## पंतप्रधान फ्रान्स दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्सच्या दौऱ्यावर असून आज ते फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह कृत्रिम बुद्धिमत्ता कृती शिखर परिषदेचं सह-अध्यक्षपद भूषवतील.  फ्रान्सचा दौरा आटोपून पंतप्रधान मोदी अमेरिकेला जाणार आहेत.

## ओमबिर्ला

जनतेच्या अपेक्षा पूर्ण करतानाच विधीमंडळाच्या सभागृहांची प्रतिष्ठा अबाधित राखणं ही देखील लोकप्रतिनिधीची महत्त्वाची जबाबदारी आहे असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी काल केलं. महाराष्ट्र विधानमंडळाच्या नवनिर्वाचित सदस्यांसाठी नवी दिल्लीत संसद परिसरात विधिमंडळ कार्यपद्धती प्रशिक्षण कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे; या कार्यक्रमाचं उद्घाटन करताना बिर्ला बोलत होते. विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यावेळी उपस्थित होत्या. राज्य विधीमंडळाच्या सदस्यांनी शून्य तास, प्रश्नोत्तर तास यांसारख्या संसदीय प्रक्रिया प्रभावीपणे वापराव्यात आणि सभागृहात सक्रिय सहभाग घ्यावा, असा आवाहन बिर्ला यांनी यावेळी केलं. महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते होणार आहे. या प्रशिक्षणाचा समारोप आज नीलम गोऱ्हे यांच्या उपस्थितीत होणार आहे.

## राष्ट्रपती

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर स्नान केलं. नंतर त्यांनी अक्षयवट आणि बडा हनुमान मंदिर इथेही भेट दिली. महाकुंभात आतापर्यंत 43 कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केलं असून तो येत्या 26 फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे.

## रेल्वे

दरम्यान महाकुंभ मेळ्यानिमित्त जानेवारी महिन्यात, पुणे विभागातून 80 हजार 177 प्रवाशांनी रेल्वेने प्रयागराजपर्यंत प्रवास केला आहे. त्यामुळे रेल्वेच्या पुणे विभागाला 8 कोटी 42 लाख रुपयांचा महसूल मिळाला आहे. पुणे विभागाचे विभागीय व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा आणि वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक डॉ.मिलिंद हिरवे यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पुणे विभागातून आत्तापर्यंत 5 विशेष रेलगाड्या प्रयागराजसाठी सोडण्यात आल्या असून 21 फेब्रुवारीलाही विशेष गाडी सोडण्यात येणार आहे. आयआरटीसीमार्फत प्रयागराज इथं यात्रेकरूंसाठी राहण्याची व्यवस्था केली आहे.

## हत्तीरोग औषधोपचार मोहिम

जागतिक आरोग्य संघटना आणि केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयातर्फे हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीमेला कालपासून सुरुवात झाली. राज्यात पालघर, नांदेड, गडचिरोली, भंडारा आणि चंद्रपूर या जिल्ह्यांतल्या विविध तालुक्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दूरस्थ माध्यमातून या

मोहिमेचं उद्घाटन केलं. या मोहिमेअंतर्गत दोन वर्षांपेक्षा लहान बालकं, गरोदर माता आणि गंभीर आजारी व्यक्ती वगळता सर्वांना प्रतिबंधक गोळ्यांचा डोस देण्यात येणार आहे.

गडचिरोली जिल्ह्यातल्या 7 तालुक्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे. याद्वारे नागरिकांना डी. ई. सी, अल्बेंडाझोल आणि आयवरमेक्टीन या तीन औषधांची मात्रा उंची आणि वयोगटानुसार देण्यात येत आहे. काल पहिल्याच दिवशी 18 हजार 321 नागरिकांना हत्तीरोग निर्मूलन औषधाची मात्रा देण्यात आली.

**<u>राज्यपाल</u>**

आजच्या आधुनिक जगात मनुष्य एकीकडे प्रगती करत असताना दुसरीकडे तो वैयक्तिक आणि भावनिक स्तरावर अशांत होत आहे; अशावेळी ब्रह्मकुमारी संस्थेच्या भगिनींचं समाजात प्रेमभावना, शांतता आणि सद्भावना प्रसाराचं कार्य अतिशय प्रशंसनीय आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. ब्रह्मकुमारी संस्थेच्या वैश्विक संस्कृती, प्रेम, शांतता आणि सद्भावना अभियानाचं उद्घाटन राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत काल मुंबईत राजभवन इथं झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>सोयाबीन</u>**

सोयाबीन खरेदीसाठी केंद्र सरकारने कोणतीही मुदतवाढ दिलेली नसल्याचं राज्याच्या पणन विभागानं स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्रात हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी आधी 13 जानेवारीपर्यंत मुदत होती; ती संपल्यानंतर केंद्र शासनाने 24 दिवसांची म्हणजे दिनांक 6 फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र महाराष्ट्रात सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिल्याचं वृत्त काही माध्यमांमधून देण्यात आलं होतं; त्यावर 6 फेब्रुवारीनंतर कोणतीही मुदतवाढ दिलेली नसल्याचं पणन विभागानं स्पष्ट केलं आहे.

**<u>नवीन उद्योग प्रकल्प-सांगली</u>**

सांगली जिल्ह्यात नवीन उद्योग प्रकल्प आणण्यासाठी प्रयत्न करण्याचं, तसंच उद्योजकांच्या अडी-अडचणी टप्प्याटप्प्याने सोडवण्याचं आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी काल दिलं. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनं सांगलमध्ये आयोजित केलेल्या उद्योग-व्यापार परिषदच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार जयंत पाटील, यावेळी उपस्थित होते.

**<u>राष्ट्रीय क्रीडा</u>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी कालही चमकदार कामगिरी केली. महिला आणि सांघिक टेनिस स्पर्धेत राज्याला रौप्य पदक मिळालं. तर मिश्र ट्रायथल रिलेमध्ये, महाराष्ट्राने सुवर्णपदक जिंकले.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.